**संक्षिप्त फौजदारी केस नं. २००/२०२०**
**नि. क्र. १९ लगत**

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०४ चा जबाब शपथेवर सुरु.</u>**

**नाव** – मयूर हेमंत गांधी,

**वय**– २९ वर्षे , **व्यवसाय** – खाजगी नोकरी,

**राहणार**– घनसोली, नवी मुंबई.

**मूळ गाव** – देवरुख, ता. संगमेश्वर, जि.रत्नागिरी.

**<u>अभियोगपक्षातर्फे सरतपास विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता कु. एस. आर. वनकर यांचेकडून</u> –**

०१. खालची आळी देवरुख येथे आमचे घर आहे. आरोपी माझी मानलेली बहीन आहे. मागील १२ ते १३ वर्षांपासून ती आमच्या घरी राहत होती. २०१८ साली आरोपी नयना यादव ही मार्लेश्वर प्रसाद बिल्डींग, देवरुख येथे राहायला गेली. तेथील तिचा रुम क्रमांक मला माहित नाही.

०२. मला या घटनेबाबत किंवा प्रकरणाबाबत काही माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक २५/११/२०१९ पासून मी आरोपी नयना यादव हिच्या सोबत मार्लेश्वर प्रसाद बिल्डींग, देवरुख येथील एका फ्लॅट मध्ये राहत होतो. माझ्या सख्ख्या बहीनीचे लग्न होते, त्यामुळे, थोडया दिवसांकरीता मी तेथे राहत होतो. मी तेथे आरोपी सोबत १० ते १५ दिवस राहिलो. त्यानंतर काय झाले हे मला माहित नाही.

**(साक्षीदार घडले हकीकतीप्रमाणे जबाब करत नाही त्यामुळे त्यास उलटतपासात विचारावयाचे प्रश्न विचारणेची परवानगी विद्वान सहाय्यक सरकारी वकील यांनी मागितली. साक्षीदाराचा वरील जबाब पाहाता, भारतीय साक्षी पुरावा चे कलम १५४ अन्वये परवानगी मंजूर.)**

०३. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०४/१२/२०१९ रोजी पोलीस दुपारी ०३.०० वाजता माझ्याकडे चौकशीकरीता आले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी मी त्या सदनिकेमध्येच राहत होतो. फ्लॅट क्रमांक ०९ व १० हे रमेश तेटांबे याचे

असल्याचे मला माहित नव्हते. त्या सदनिकांचे कुलूप नयना यादव यांनी तोडले, असे काही मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझी मानलेली बहीन असल्यामुळे तिला वाचविण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास – आरोपीतर्फे कोणीही वकील हजर नाहीत. आरोपीस विचारण्यात आले की, तिला साक्षीदाराला काही प्रश्न विचारावयाचे आहेत काय, त्यावर तीने सांगितले की, ''साक्षीदाराने जे सांगितले ते खोटे आहे, मला काही विचारायचे नाही''. सबब, उलटतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

TARE BALIRAM DATTATRAYA

Digitally signed by TARE BALIRAM DATTATRAYA Date: 2024.06.20 15:27:31 +0530

**(ब. द. तारे)**

दि. २०.०६.२०२४ न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख

-:CERTIFICATE:-

Judgment/order/evidence in ( Order below Exh.1 in SC.C. No. 200/2020)

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date | :- | 20/06/2024 |
| Evidence signed by PO. on | :- | 20/06/2024 |
| Evidence uploaded on | :- | 20/06/2024 |